# राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग - १२

११ वा मजला, ए विंग, रुपा रेनिसन्स, डी-३३,
एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया,
वस्तू व सेवाकर कार्यालय,
तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०३.

सत्यमेव जयते

दूरध्वनी क्रमांक : ९४२१०००५९६ | ई मेल : eonodal१२@gmail.com


---

क्रमांक:- रासआ/नोडल-१२/आस्था/जाहिरात/२०२६-२७/ब-३८० मुंबई, दिनांक. 01.04.2026

प्रति,
मा. राज्यकर सहआयुक्त (महाविकास)
वस्तू व सेवाकर भवन, माझगांव,
मुंबई - ४०० ०१०

**विषय**:- विभागाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.

**संदर्भ**:- मा. अपर राज्यकर आयुक्त, परिक्षेत्र-४, मुंबई यांचे अनौ. संदर्भ क्र. २५१ दि. ३०.०३.२०२६.

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरून या कार्यालयात सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी (गट-ब) यांची करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे. त्यासंबंधात मा. अपर राज्यकर आयुक्त, परिक्षेत्र-४, मुंबई यांची मान्यता घेण्यात आलेली असून करार पद्धतीने नियुक्ती करण्यासंदर्भातील जाहिरात 'अ' दर्जाच्या एका मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत मा. राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क), वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे. तरी सोबतची माहिती विभागाची संकेतस्थळ http://mahagst.gov.in वर उपलब्ध करण्यात यावी, ही विनंती.

सोबत : अटी व शर्तीबाबतचे पत्र, जाहिरातीचा नमुना व आवेदन पत्राचा नमुना.

आस्थापना अधिकारी
नोडल विभाग-१२ व लेखा परिक्षण-४, मुंबई.

O/C

09/04/2026

09/04/26.

राज्यकर सहआयुक्त (महाविकास) यांचे
कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग - १२

११ वा मजला, ए विंग, रुपा रेनिसन्स, डी-३३,
एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया,
वस्तू व सेवाकर कार्यालय,
तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०३

दूरध्वनी क्रमांक : ९४२१०००५९६ ई मेल : eonodal१२@gmail.com


---

सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या तरतुदीनुसार वस्तू व सेवाकर विभागातील आस्थापना विषयक कामाचा निपटारा करण्यासाठी राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग-१२ माझगांव, मुंबई मधून सेवानिवृत्त झालेले गट-ब (राजपत्रित) संवर्गातील १ राज्यकर अधिकारी यांची सेवा करार पद्धतीने नियुक्त करण्यासाठी सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर नियुक्ती राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग-१२, तुर्भे, नवी मुंबई या कार्यालयासाठी सेवा करार (कंत्राटी) पद्धतीने उपरोक्त शासन निर्णयानुसार ठरविलेल्या मासिक पारिश्रमिकावर करण्यात येतील.

प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवाराची निवड करुन नामिकासुची (Empanelment) तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून सुयोग्य उमेदवार शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून एक वर्षासाठी करार पद्धतीने नियुक्त करण्यात येईल.

सदर नेमणुकीसंदर्भात सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१. उपरोक्त नमुद केलेल्या सेवानिवृत्त राज्यकर अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार आस्थापना विषयक बाबीसंदर्भात कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

२. सदर अर्जदारावर विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी.

३. अर्जदार मानसिक, शारीरीक व आरोग्यदृष्ट्या सक्षम असावा व त्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

४. वित्तलब्धी पात्र राज्यकर अधिकाऱ्यांची नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

५. ज्या विवक्षित कामासाठी निवड करावयाची आहे त्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना निवड करतांना प्रधान्य दिले जाईल.

६. आवश्यकता भासल्यास उमेदवारांची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल.

७. सदर नियुक्ती करार पद्धतीने असल्यामुळे नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीकडून सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

८. या व्यतिरिक्त शासन निर्णयानुसार दिलेल्या इतर सर्व अटी व शर्ती लागु होतील.

वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी **राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग-१२, ११ वा मजला, ए विंग, रुपा रेनिसन्स, डी-३३, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया, वस्तू व सेवाकर कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०३** यांचेकडे अर्ज सादर करावा.

क.स. आ.अ. कार्या. प्रमुख.

राज्यकर सहआयुक्त,
नोडल विभाग-१२, मुंबई

# वस्तू व सेवाकर विभाग, तुर्भे, नवी मुंबई

## सेवानिवृत्त गट-ब (राजपत्रित) संवर्गातील राज्यकर अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत

---

वस्तु व सेवाकर विभागातील राज्यकर सहआयुक्त, नोडल-१२, तुर्भे, नवी मुंबई यांच्या आस्थापना कार्यालयाकरिता आस्थापना विषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या गट-ब (राजपत्रित) संवर्गातील राज्यकर अधिकारी या पदांवरून सेवानिवृत्त झालेले १ राज्यकर अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासुची (Empanelment) तयार करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ च्या अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ http://mahagst.gov.in वर उपलब्ध करण्यात आलेली आहे. इच्छुक व्यक्तींनी संकेत स्थळावरील माहिती पाहून विहित नमुन्यातील अर्ज **आस्थापना अधिकारी, राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग-१२, ११ वा मजला, ए विंग, रुपा रेनिसन्स, डी-३३, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया, वस्तू व सेवाकर कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०३** यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत सादर करावेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | सेवानिवृत्त गट-ब (राजपत्रित) राज्यकर अधिकारी पदांची संख्या | संपर्क |
|---|---|---|---|
| १. | राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग-१२, ११ वा मजला, ए विंग, रुपा रेनिसन्स, डी-३३, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया, वस्तू व सेवाकर कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई - ४०० ७०३ | ०१ | eonodal12@gmail.com<br>भ्रमणध्वनी क्रमांक - ९४२१०००५९६ |

# आवेदन पत्र

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नाव | : |
| २. | जन्म तारीख | : |
| ३. | पत्र व्यवहाराचा पत्ता | : |
| ४. | भ्रमणध्वनी क्रमांक | : |
| ५. | ई-मेल | : |
| ६. | सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद | : |
| ७. | सेवानिवृत्तीचा दिनांक | : |
| ८. | सेवानिवृत्तीवेळचे कार्यालय | : |
| ९. | सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी | : |
| १०. | सेवानिवृत्तीच्या अगोदरच्या लगतच्या तीन नेमणुका | : |

| नेमणुक | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|
| | | |

| | | |
|---|---|---|
| ११. | सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी | : |
| १२. | शैक्षणिक अर्हता | : |
| १३. | संगणक ज्ञान | : |
| १४. | विभागीय चौकशीची कार्यवाही प्रलंबित आहे काय ?<br>अशा चौकशी प्रकरणी कोणती शिक्षा झाली आहे काय ? | : |
| १५. | न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे काय ?<br>असल्यास विवरण द्यावे. | : |
| १६. | कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (१०० शब्दांमध्ये) | : |
| १७. | आस्थापना विषयक बाबींचे किंवा प्रशासकीय बाबींचे ज्ञान | : |

स्वाक्षरी :-

दिनांक :-